पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/७अ/कावि/८६०/२०१४
दिनांक :-२९/११/२०१४

**परिपत्रक,**

**विषय :- कंत्राटी कामगाराचे भविष्यनिर्वाह निधी रकमेच्या कपातीबाबत.**

३/- उपरोक्त विषयांकित बाबीं संदर्भात कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या दिनांक ८/०१/२०११ च्या नोटीफिकेशनद्वारे भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ ची अंमलबजावणी करणे महापालिकेस अनिवार्य झालेले आहे. महापालिकेने नेमलेल्या कंत्राटदारांनी नियुक्त केलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी माहे जानेवारी २०११ पासून भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक असलेबाबत कामगार कल्याण अधिकारी यांनी वारंवार कळविले आहे. तथापि महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून नियुक्त केलेल्या ठेकेदारांनी नेमलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी वेळेत भरला नाही. असे निर्दशनास आलेने भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने महापालिकेविरुध्द भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील कलम 7 A खाली खटला दाखल केला असून त्याची सन २०१३ पासून सुनावणी चालू केलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २१ नोव्हेंबर २०१४ रोजी सुनावणी झाली असून त्यामध्ये सहा. आयुक्त यांना भविष्य निर्वाह निधीसाठी महानगरपालिकेच्या बँक खाते क्रमांकाची माहिती देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सर्व संबंधित शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागातील महसूली / भांडवली खर्चाची बिले लेखा विभागास सादर करणेपूर्वी संबंधित बिला संदर्भात भविष्य निर्वाह निधीची पुर्तता केली आहे किंवा कसे? याबाबत महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागाशी संपर्क साधून त्यांनी दिलेल्या सुचनांची पूर्तता केल्याची खातरजमा करुनच लेखा विभागाकडे बिले पाठविण्यात यावी. भविष्य निर्वाह निधीची पूर्तता केले शिवाय कोणतेही बिल लेखा विभागास पाठवू नये. अन्यथा भविष्य निर्वाह निधी कार्यालयामार्फत काही कारवाई झालेस संबंधित विभागाचे शाखाप्रमुख / विभागप्रमुख म्हणून आपणास जबाबदार धरणेत येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८

प्रति, ___________

प्रति- सर्व संबंधित विभागप्रमुख / शाखाप्रमुख
माहिती व कार्यवाहीसाठी